# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.06.2025** **वार-गुरुवार**

---

**फिरतेचित्ररथ**

गेल्या अकरा वर्षांच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एक शक्तिशाली, सामर्थ्यवान राष्ट्र म्हणून भारत जगभरात नावाजला जात आहे; असे गौरवोद्गार केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात काढले. केंद्र सरकारच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी केंद्रीय संचार ब्युरोनं पालखी मार्गांवर फिरत्या प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या अंतर्गत दोन चित्ररथांचं उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम क्षेत्र महासंचालक, स्मिता वत्स शर्मा उपस्थित होत्या. यावेळी भारुड, अभंग, गवळण यासारख्या महाराष्ट्राच्या लोककलांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या योजनांची माहिती देण्यात आली. संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या पालख्यांच्या मार्गांवर हे चित्ररथ विविध गावांत फिरून केंद्र सरकारच्या योजनांची माहिती देणार आहेत; तसंच या माध्यमातून संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम यांच्या जीवनावर आधारित जीवनपटही दाखवण्यात येणार आहेत.

**ज्ञानेश्वरमाऊली**

आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा आज आळंदी इथून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. यंदा पालखी प्रस्थान सोहळा रात्री आठच्या सुमारास होणार आहे. या सोहळ्यासाठी अलंकापुरी सजली असून हजारो वारकरी आळंदीमध्ये दाखल झाले आहेत.

**<u>तुकाराममहाराजपालखी</u>**

दरम्यान संतशिरोमणी तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचं आज आकुर्डीमध्ये आगमन होत आहे. आज पालखी सोहळा आकुर्डीत विसावणार आहे. "सुरक्षित वारी, अखंड सेवा!" या भावनेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज आहेत. आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी ७ सदस्यांचं विशेष प्रशिक्षित पथक वारी दरम्यान नेमण्यात आलं आहे.

**<u>वाहतूकबदल</u>**

जगद्गुरु तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचं उद्या पुण्यात आगमन होणार आहे. यामुळे उद्या सकाळी आठ ते मध्यरात्रीपर्यंत शहरातील २६ रस्ते बंद करण्यात येणार आहेत. या दरम्यान नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा तसंच मध्य पुण्यातील रस्त्याने वाहतूक टाळावी, असं आवाहन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी केलं आहे.

**<u>फिरतादवाखाना</u>**

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आणि शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्टनं वारकऱ्यांसाठी फिरता दवाखाना सुरू केला आहे. याचं उद्घाटन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत झालं. अथक परिश्रम घेऊन निःस्वार्थपणे वारकऱ्यांची सेवा करणारे सर्वजण पंढरीचे 'वारीवीर'च आहेत," अशी भावना चंद्रकांत पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

**<u>विद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदा क्यू एस जागतिक क्रमवारीत आपल्या कामगिरीत सुधारणा करत जगातील पहिल्या सहाशे विद्यापीठांच्या यादीत नाव पटकावलं आहे. गेल्या वर्षी विद्यापीठ ६४०व्या स्थानावर होतं; यंदा विद्यापीठाने ५६६व्या स्थानावर झेप घेतली आहे.

**<u>सांडपाणीप्रकल्प</u>**

औंध इथल्या जैवविविधता उद्यानात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी राज्य सरकारच्या महसूल आणि वन विभागाने या जागेवरील जैवविविधता वारसास्थळाचं आरक्षण उठवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळावं असा अर्ज पुणे महापालिकेने राहुरीच्या कृषी विद्यापीठाकडे केला आहे.

**<u>महोत्सव</u>**

ज्येष्ठ गायिका विदुषी ज्योत्स्ना भोळे यांना सांगीतिक मानवंदना देण्यासाठी पुण्यात येत्या २६ आणि २७ जून रोजी ज्योत्स्ना भोळे स्वरोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. सृजन फाऊंडेशन आणि नांदेड सिटीच्या वतीनं आयोजित हा महोत्सव रसिकांसाठी विनामूल्य खुला असेल, अशी माहिती महोत्सवाचे मुख्य आयोजक अधीश पायगुडे यांनी दिली.

**<u>अपघात</u>**

पुण्याजवळ जेजुरी-मोरगाव रस्त्यावर काल संध्याकाळी भरधाव टेम्पो आणि चारचाकी गाडीच्या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले. या अपघाताबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं असून, पंतप्रधान मदतनिधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपये, तर जखमींना 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<u>क्रीडा</u>**

म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात १८ वर्षाखालील मुलं आणि मुलींच्या राज्य अजिंक्यपद कबड्डी निवड चाचणी स्पर्धेत मुलींच्या गटात पुणे ग्रामीण तर मुलांच्या गटात परभणी संघांनी अजिंक्यपद पटकावलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून पावसाची संततधार सुरू आहे. खडकवासला धरण परिसरातही जोरदार पाऊस सुरू असल्याने धरणातून आज दुपारपासून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू आहे. यात टप्प्याटप्प्याने वाढ होण्याची शक्यता आहे; त्यामुळे पुणे महापालिकेनं नदीकाठच्या नागरिकांना सावधानतेचा इशारा दिला आहे. आगामी २४ तासांत पुणे तसंच घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**